पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रम

**परिपत्रक**

जा.क्र.मराशैसंप्रप/प्रपयो/प्रवेश/1579/2016
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद,(विद्यापरिषद) पुणे 30.
दिनांक : 01/04/2016.

प्रति,

1) मा. आयुक्त, समाज कल्याण विभाग पुणे.
2) मा. आयुक्त, अपंग कल्याण विभाग, पुणे.
3) मा. संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती पुणे .
4) मा. आयुक्त आदिवासी कल्याण विभाग नाशिक.
5) विभागीय शिक्षण उपसंचालक, (कोल्हापूर, पुणे, मुंबई, नाशिक, लातूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
6) शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) (सर्व)
7) शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) (सर्व)
8) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई पश्चिम, उत्तर, दक्षिण.
9) शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) बृहन्मुंबई मनपा.
10) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका व नगरपालिका सर्व

**विषय :- पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्राथमिक / उच्चप्राथमिक स्तरावरील अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षण देणेबाबत..**

संदर्भ:- 1) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक सीव्हीटी-1098 / ( 69 / 96 ) / माशि- 4, दिनांक 5 फेब्रुवारी 1999

2) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक अशिसे 2015 / प्रक्र 148/ टिएनटी-1 दिनांक 9-2-2016

उपरोक्त संदर्भ क्रमांक 2 च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व पात्र अप्रशिक्षित शिक्षक / शिक्षण सेवक यांना पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासंदर्भात दिनांक 28 फेब्रुवारी, 2019 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याकरिता सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शाळामधील अप्रशिक्षित शिक्षक / शिक्षण सेवक यांचेसाठी सन 2016-2017 मध्ये पत्रव्दारा प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे.

सदर प्रवेशाबाबतची माहिती पुस्तिका व आवेदन पत्राचा नमुना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( विद्या परिषद ) पुणे यांच्या www.mscert.org.in या संकतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रम

**<u>तसेच माहिती पुस्तिकेतील पान क्रमांक १७ वरील प्रसिद्धी निवेदन आपण आपल्या जिल्ह्यातील प्रसिद्ध वर्तमान पत्रात दिनांक ०५/०४/२०१६ रोजी प्रसिद्धीसाठी द्यावे. वर्तमान पत्रात आलेली बातमीची कात्रणे या कार्यालयास ccumscert@gmail.com या मेल अड्रेसवर दिनांक १२/०४/२०१६ पूर्वी किंवा तत्पूर्वी पाठवावीत.</u>**

त्यामधील सूचनांनुसार कार्यवाही करुन अंतिम यादी खास दूतामार्फत सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार त्या त्या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी सर्व संबंधित यांची राहिल.

(गोविंद नांदेडे)
**संचालक**
**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे 30.**

## पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षण प्रवेश प्रक्रिया सन 2016-2017 अंमलबजावणी वेळापत्रक

| अ. क्र | कार्यवाहीचा तपशिल | नियोजित कालावधी |
|---|---|---|
| 1 | विभागीय शिक्षण उपसंचालक / विज्ञान सल्लागार, अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग, प्रादेशिक उपआयुक्त समाज कल्याण यांची बैठक घेऊन आवेदनपत्र व माहिती पुस्तिका वितरण व मार्गदर्शन करणेबाबत. | 04/04/2016 |
| 2 | माहिती पुस्तिका www.mscert.org.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे. | 04/04/2016 |
| 3 | विभागीय शिक्षण उपसंचालक, अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग, प्रादेशिक उपआयुक्त समाज कल्याण यांनी सहविचार सभा घेऊन आवेदनपत्र व माहिती पुस्तिकाबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई, प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना सादर करणेबाबत मार्गदर्शन करणे. | 05/04/2016 |
| 4 | पूर्ण भरलेले आवेदनपत्र उमेदवारांनी शिक्षणाधिकारी (प्राथ) / सहाय्यक आयुक्त समाज कल्याण आणि प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग यांच्याकडे सादर करणे. (सुटटीचे दिवस वगळून सकाळी 10 ते सायं.5 वाजेपर्यत) | 06/04/2016 ते 18/04/2016 |
| 5 | शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी तयार केलेली विहित प्रपत्रातील माहिती शिफारशीसह व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आवेदनपत्रे व शिफारस असलेली व शिफारस नसलेली स्वतंत्र यादी विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करणे. | 22/04/2016 |

| | | |
|---|---|---|
| | पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | |
| 6 | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी तयार केलेली विहित प्रपत्रातील माहिती शिफारशीसह व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आवेदनपत्रे व शिफारस असलेली व शिफारस नसलेली स्वतंत्र यादी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण (पुणे, औरंगाबाद, नाशिक, मुंबई, अमरावती, नागपूर) यांच्याकडे सादर करणे. | 22/04/2016 |
| 7 | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांनी तयार केलेली विहित प्रपत्रातील माहिती शिफारशीसह व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आवेदनपत्रे व शिफारस असलेली व शिफारस नसलेली स्वतंत्र यादी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग (नागपूर, अमरावती, नाशिक, ठाणे) यांच्याकडे सादर करणे. | 22/04/2016 |
| 8 | विभागीय शिक्षण उपसंचालक, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी पात्र असलेली व अपात्र असलेली स्वतंत्र यादी शिफारशीसह DVB-TT-Surekh, Font-14 मध्ये MS Excel मध्ये विहित प्रपत्रातील माहिती मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( विद्या परिषद) पुणे यांचेकडे CD व प्रिंट कॉपीसह सादर करणे | 28/04/2016 |

**(गोविंद नांदेडे)**
**संचालक**
**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व**
**प्रशिक्षण परिषद, पुणे 30.**

**<u>प्रत माहिती आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी</u>**

a. अपर आयुक्त आदिवासी विकास ( ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर ) यांचे कार्यालय
b. विभागीय शिक्षण उपसंचालक (मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, लातूर)
c. विभागीय समाजकल्याण अधिकारी (मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, )
d. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / प्रशासन अधिकारी) जिल्हा परिषद / मनपा सर्व
e. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / शिक्षण निरिक्षक) बृहन्मुंबई, हिंदू कॉलनी, दादर,मुंबई
f. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण जिल्हा सर्व.
g. प्रकल्पाधिकारी, आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प सर्व.
h. उपसंचालक, शिक्षक शिक्षण व प्रशिक्षण विभाग विद्या परिषद, पुणे.

पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रम

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा. मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई 32.
२) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई 32.
४) मा सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32.
५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे 1.
६) शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे1.
७) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

(गोविंद नांदेडे)
संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे 30.

# महाराष्ट्र शासन
# शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
# पत्रव्दारा प्रशिक्षण योजना
# सन 2016-2017

## सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शाळांमधील अप्रशिक्षित शिक्षक, शिक्षण सेवक यांना पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश

## माहिती पुस्तिका

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( विद्या परिषद )**

**708, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे 411 030.**

**दुरध्वनी क्र. 020-24478122, 020-24476938,**

**020-24475571, 020-24466246**

**विद्या परिषद ई-मेल:- dir.mscert@gmail.com**

**पत्रद्वारा प्रशिक्षण विभागाचा ई-मेल:- ccumscert@gmail.com**

## <u>पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेतून पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी उमेदवाराच्या पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे राहतील.</u>

1. शासन मान्य सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शाळांमधील कार्यरत अप्रशिक्षित शिक्षक / शिक्षण सेवक / निमशिक्षक प्रवेशास पात्र राहतील.
2. नेमणूकीचे वेळी उमेदवाराचे वय 18 वर्षे पूर्ण असावे.
3. उमेदवार किमान **उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र** परीक्षा (एच.एस.सी.) महाराष्ट्रातून उत्तीर्ण असावा. किंवा बाहेरील राज्यातून 12 वी उत्तीर्ण उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचा जिल्हाधिकारी यांचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.
4. उमेदवाराची नेमणूक पूर्ण वेळ व मान्य पदावर असावी.
5. उमेदवार पत्रव्दारा प्रशिक्षण पूर्ण होईपर्यत सेवेत कार्यरत असणे आवश्यक आहे.
6. उमेदवाराच्या नियुक्तीस सक्षम प्राधिका-याने वैयक्तिक मान्यता दिलेली असणे आवश्यक आहे.
7. जात प्रवर्गातून नियुक्त उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.
8. उमेदवार नेमणूक दिनांकापासून आज पर्यंत सेवत कार्यरत पाहिजे.
9. उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय 17/09/2011 मध्ये अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातून अप्रशिक्षित शिक्षण सेवकांची नेमणूक करावयाची शासन निर्णय शिक्षण विभाग क्रमांक: पीआरई 2002 / (3395) / प्राशि 1 दिनांक 27 फेब्रुवारी 2003. मधील तरतूद रदद केल्याने उमेदवाराची नियुक्ती 17/09/2011 पूर्वीची असावी.
10. माहिती पत्रकात निर्देशित केल्याप्रमाणे आवेदन पत्रासोबत जोडलेल्या सर्व साक्षांकित छायाप्रतींच्या मूळ प्रती छाननीच्या वेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर करणे बंधनकारक राहील.
11. पत्रव्दारा प्रशिक्षणाच्या आवेदन पत्रासोबत रुपये 100/- चा स्टॅप पेपरवर विहित नमुन्यातील हमीपत्र देणे आवश्यक राहील.

**<u>उपरोक्त 1 ते 11 निकष सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या अनुदानित / विनानुदानित / कायम विनानुदानित शाळांमधील अप्रशिक्षित शिक्षक / शिक्षण सेवक उमेदवारांना लागू राहतील. या व्यतिरिक्त समाज कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास विभाग, अपंग कल्याण विभाग यांच्या अधिपात्याखालील शाळेतील अप्रशिक्षित शिक्षक / शिक्षण सेवक / निमशिक्षक यांना त्या त्या व्यवस्थापनासाठीचे नियम व अति शर्ती लागू राहतील.</u>**

## <u>आवेदनपत्रासोबत उमेदवाराने जोडावयाचे आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींची यादी.</u>

**1)** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र व गुणपत्रक.

**2)** उमेदवारांच्या नावात बदल झाला असल्यास बदलाबाबतचा अधिकृत पुरावा. व झालेल्या बदलास मंजूरी दिल्याचे अधिकृत पत्र.

**3)** उमेदवार मागासवर्गीय असल्यास विहित नमुन्यातील सक्षम अधिका-याचे जातीचे प्रमाणपत्र.

**4)** सक्षम अधिका-याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र.

**5)** ज्या संस्थेच्या शाळेमध्ये प्राथमिक शिक्षक / शिक्षण सेवक म्हणून सेवा केली आहे त्या त्या संस्थेच्या शाळेचे नियुक्ती आदेश / बदलीचे आदेश, त्या प्रत्येक शाळेच्या प्रथम मान्यतेचे आदेश तसेच तुकडी मान्यतेचे आदेश व रुजू अहवाल प्रत.

**6)** सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या वैयक्तिक मान्यता प्रती.

**7)** उमेदवाराची नियुक्ती आरक्षणानुसार असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या विंदू नामावलीची प्रत व ज्या पानावर उमेदवाराचे नाव आहे त्या पानाची साक्षांकित प्रत.

**8)** विहित उच्च वय मर्यादापेक्षा नियुक्तीच्या वेळी जादा वय असल्यास जादा वय क्षमापित केले असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे पत्र.

**9)** उमेदवारास पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेत प्रवेशाबाबत मा.न्यायालयाने निर्देश दिले असल्यास त्या निर्णयाची साक्षांकित प्रत.

**10)** उमेदवाराने वेगवेगळया संस्थेत सेवा केलेली असल्यास त्या प्रत्येक संस्थेचे सेवा प्रमाणपत्र आवेदन पत्रासोबत जोडावे.

**11)** उमेदवाराची सेवा अखंडित असावी. दोन भिन्न संस्थेत सेवा केलेली असल्यास सदर संस्था / शाळेतील सेवा सलग असल्याबाबतचे सक्षम अधिकारी पत्र.

**12)** रुपये 100/-च्या स्टॅप पेपरवरील विहित नमुन्यातील हमीपत्र.

**13)** अनुसूचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग या प्रवर्गातील प्रशिक्षित उमेदवार न मिळाल्याची खात्री केल्यानंतरच संबंधित संवर्गातील अप्रशिक्षित शिक्षक / शिक्षण सेवकास वैयक्तिक मान्यता दिलेली आहे असे वैयक्तिक मान्यता देण्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.

- उमेदवाराने उपरोक्त बाबींपैकी लागू असलेल्या योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात.
- सर्व छायाप्रती सक्षम अधिका-यांकडून प्रमाणित / सांक्षांकित केलेल्या असाव्यात.
- आवेदन पत्रासोबत आवश्यक कागदपत्रा व्यतिरिक्त अनावश्यक कागदपत्रे जोडू नयेत.

**<u>हमीपत्र नमुना</u>**

मी श्री / श्रीमती शाळा तालुका जिल्हा या शाळेत अप्रशिक्षित शिक्षक / शिक्षण सेवक पदावर कार्यरत असून मला शैक्षणिक वर्ष 2016-2017 या वर्षी पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेतून शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणास प्रचलित नियम, अटी व निकषानुसार प्रवेश द्यावा. सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्षे 2016-2017 या वर्षापासून 28/02/2019 पूर्वी उत्तीर्ण न झाल्यास माझा सेवेवरील हक्क शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक: अशिसे- 2015 / प्रक्र-148 / टीएनटी-1. दिनांक 09-02-2016 नुसार संपुष्टात येईल व त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही असे हमीपत्र लिहून देत आहे.

स्थळ:-
दिनांक:-

उमेदवाराची स्वाक्षरी
पूर्ण नाव व पूर्ण पत्ता

## <u>पत्रव्दारा प्रशिक्षण योजना प्रशिक्षणासाठी खालील कारणास्तव अप्रशिक्षित शिक्षकांना / शिक्षण सेवकांना</u> प्रवेश दिला जाणार नाही.

1) ज्या शिक्षकांनी / शिक्षण सेवकांनी विहीत मुदतीत आवेदनपत्रे व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे सोबत सादर न केल्यास,

2) आवेदन पत्रातील माहिती व त्यासोबतची आवश्यक ती सहपत्रांच्या छाननीसाठी मूळ कागदपत्रे छाननीच्या वेळी संबंधितांना उपलब्ध करुन न दिल्यास.

3) विहित नमुन्यात दिलेली माहिती मूळ कागदपत्रातील नोंदीशी विसंगत असल्यास किंवा माहिती अपूर्ण असल्यास.

4) रजा कालावधीत नेमलेले शिक्षक / शिक्षण सेवक असल्यास,

5) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक- पीआरई- 2006 / 5153 / / प्राशि-1. दिनांक 2 जानेवारी 2007 नंतर नियुक्त केलेले एमसीव्हीसी विषय घेऊन एच. एस. सी. उत्तीण झालेले उमेदवार पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेच्या डीएलएड प्रशिक्षणास पात्र नाहीत.

## <u>पत्रव्दारा प्रशिक्षण अभ्यासक्रम शुल्काचे दर</u>

प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारास शासन निर्णय क्रमांक सीव्हीटी 2007 / (326 / 07) / माशि-4, दिनांक 18 जुलै 2007 नुसार पत्रव्दारा प्रशिक्षणासाठी आकारण्यात येणा-या शुल्काचे दर प्रति विद्यार्थी प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी खालीलप्रमाणे भरावे लागेल. किंवा शासन निर्णयाने सुधारित करण्यात येतील त्या दराने शुल्क भरावे लागेल

| **अ.क्र.** | **बाब** | **दर रुपये** |
|---|---|---|
| 1. | शैक्षणिक शुल्क | 8,000/- |
| 2. | वाढीव सत्रासाठी शुल्क (त्रुटी सत्रासाठी ) | 800/- |
| | **एकूण** | **8,800/-** |

प्रत्येक छात्र शिक्षकाने आवश्यक ते शैक्षणिक शुल्क प्रत्येक वर्षाच्या आरंभी मार्गदर्शन केंद्राच्या प्राचार्याकडे भरावयाचे आहे.

1) सेवांतर्गत अभ्यासक्रम पूर्ण करणा-या छात्रशिक्षकांने दुस-या वर्षाचे शैक्षणिक शुल्क अध्यापक विद्यालयात दुस-या वर्षाच्या आरंभी भरावयाचे आहे. छात्र शिक्षकांनी दुस-या वर्षी प्रवेशासाठी पत्रव्दारा प्रशिक्षण योजना विभागाकडे पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. दुसऱ्या वर्षाचे प्रवेश देण्यास संबधित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य सक्षम आहेत.

2) छात्र शिक्षकाने कोणत्याही परिस्थितीमध्ये या कार्यालयाकडे शैक्षणिक शुल्क पाठवू नये.

3) छात्र शिक्षकाने आवश्यक ते शैक्षणिक शुल्क जमा केल्यानंतर ते कोणत्याही कारणास्तव परत करण्यात येत नाही. त्यासाठी उमेदवाराने कोणताही पत्रव्यवहार करु नये.

4) छात्र शिक्षकांची मार्गदर्शन सत्राची उपस्थिती विहीत नियमानुसार नसल्यास, वाढीव सत्रासाठी / त्रुटी सत्रासाठी वाढीव शुल्क भरावे लागेल.

5) शैक्षणिक शुल्क हस्याने स्वीकारले जात नाही.

6) शैक्षणिक शुल्का व्यतिरिक्त परिक्षा शुल्क वेगळे भरावे लागेल.

## पत्रव्दारा प्रवेशासाठी खालील कारणास्तव आवेदनपत्र अपात्र ठरविले जाईल.

1) अपूर्ण भरलेले / खाडाखोड केलेले आवेदनपत्र

2) छायांकित व साक्षांकित प्रती सोबत नसलेले आवेदनपत्र.

3) विसंगत माहिती नोंद केलेले आवेदनपत्र.

4) विहित मुदतीनंतर पोस्टाने / कुरिअरने आलेले आवेदनपत्र.

5) उमेदवाराची स्वाक्षरी नसलेले आवेदनपत्र.

6) मुख्याध्यापक यांची शिफारस नसलेलेल आवेदन पत्र

## पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेत उमेदवारास दिलेला प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही :-

**1)** उमेदवारास दिलेला प्रवेश रद्द करण्याचा अधिकार मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांना राहील.

2) आवेदन पत्रात उमेदवाराने दिलेली माहिती सोबतची कागदपत्रे / सहपत्रे दिशाभूल करणारी अथवा खोटी आढळल्यास अगर प्रवेशाबाबत कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळल्यास दिलेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

3) पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमास प्रवेश दिल्यानंतर मार्गदर्शन केंद्रावरील सत्र सुरु झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या पहिल्या तीन दिवसात प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवेश आपोआप रद्द होईल.

4) शिक्षणशास्त्र पदविका प्राप्त होण्या अगोदर प्रवेश झालेल्या उमेदवारास सेवेतून कोणत्याही कारणास्तव काढून टाकल्यास अथवा उमेदवाराने स्वत: सेवा सोडल्यास त्या तारखेपासून त्याचा पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेचा प्रवेश आपोआप रद्द होईल.

5) उमेदवाराची शाळेतील सेवा संपुष्टात आणली अथवा उमेदवाराने शाळेतील सेवेचा राजीनामा दिलेला आहे असे उमेदवाराच्या सेवेबाबत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्यांमार्फत परिषदेस कळविणे बंधनकारक आहे व ही बाब मुख्याध्यापकांनी निदर्शनास न आणता उमेदवाराचा प्रवेश चालू राहून शिक्षणशास्त्र पदविका उमेदवाराने धारण केल्यास उमेदवाराची शिक्षणशास्त्र पदविका रद्द करण्याची कारवाई केली जाईल.

6) कोणत्याही उमेदवाराचा प्रवेश कोणत्याही कारणास्तव कोणत्याही टप्प्यावर रद्द झाल्यास तसेच संपादणूक रद्द झाल्यास उमेदवाराच्या सेवा, वेतन इत्यादी बाबीस महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद जबाबदार राहणार नाही.

7) कोणत्याही कारणास्तव केंव्हाही प्रवेश रद्द केल्यास कोणतीही फी परत केली जाणार नाही.

## पत्रव्दारा प्रशिक्षण योजनेमध्ये प्रवेश मिळाल्यानंतर उमेदवाराने लक्षात घ्यावयाच्या सचूना-

1) प्रशिक्षणाच्या संपूर्ण कालावधीत प्राथमिक शिक्षक म्हणून सेवेत असणे बंधनकारक आहे. ( सेवेतून कमी केल्यास अगर सेवा सोडल्यास सदर प्रवेश रद्द करण्यात येईल.)

2) या योजनेव्दारे पहिल्या प्रयत्नासाठी जे उमेदवार परीक्षेस बसतील त्यांचे बाबतीत सदर काळ सेवाकाळ म्हणून समजण्यात येईल, मात्र उमेदवारांना प्रवासभत्ता व दैनिकभत्ता लागू होणार नाही.

3) मार्गदर्शन केंदावरील अध्यापनकार्य मराठी माध्यमात चालेल, अन्य भाषा माध्यमाची सोय या प्रशिक्षणात उपलब्ध नाही याची नोंद घ्यावी.

4) मार्गदर्शन केंद्रावरील सत्रात व सेवांतर्गत सत्रात पूर्ण दिवस व सर्व तासिंकांना उपस्थित रहावे लागेल. उपस्थितींचे व प्रात्यक्षिक कामाचे नियम न पाळल्यास किंवा त्रुटीसत्र राहिल्यास परीक्षेस बसता येणार नाही.

5) उपलब्ध सोईनुसार मार्गदर्शन व सेवांतर्गत प्रशिक्षण सत्रासाठी कोणत्याही जिल्हयामध्ये पाठविल्यास तेथे जाऊन प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल.

6) एखाद्या सत्रात प्रशिक्षणार्थी दोन दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्यास किंवा त्या सत्रास अनुपस्थित राहिल्यास ते त्रुटी सत्र समजण्यात येईल व ते त्रुटी शुल्क ( प्रत्येक सत्रास रुपये 800/- ) भरुन पूर्ण केल्याशिवाय परीक्षेस बसता येणार नाही.

7) सत्राचा नेमका कालावधी समजण्यासाठी छात्रशिक्षकांनी आपल्या मार्गदशन केंद्राच्या संपर्कात राहावे.

8) एखाद्या सत्राची सबळ कारणाशिवाय त्रुटी राहिल्यास पुन्हा सत्र पूर्ण करण्यासाठी संबंधितास उपसंचालक ( प्रपयो ) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( विद्या परिषद ) पुणे-30 यांचेकडे मुख्याध्यापक व प्राचार्यामार्फत अर्ज करावा लागेल व या परिषदेच्या आदेशाने संबंधित त्रुटी सत्र पूर्ण करता येईल.

9) प्रशिक्षण देणे ही शासनाने उपलब्ध केलेली सुविधा आहे. तो आपला हक्क् नव्हे. तरी या सुविधेचा छात्र शिक्षकांनी जबाबदारीने उपयोग करुन घ्यावा. शिस्तीचे चोख पालन करावे. गैरशिस्त छात्रशिक्षक आढळल्यास त्यांचे प्रवेश रदद करण्यात येतील.

10) कोणत्याही परिस्थितीत दिलेले प्रशिक्षण केंद्र बदलून दिले जाणार नाही.

## छात्रशिक्षकांच्या पत्त्यातील बदल व पत्रव्यवहार :

छात्रशिक्षकाने पत्रव्यवहारांसाठी दिलेला पत्ता काही अपरिहार्य कारणामुळे बदलल्यास बदललेल्या शाळेचा पत्ता मुख्याध्यापकांमार्फत छात्रशिक्षकाने या कार्यालयास मार्गदर्शन केंद्रामार्फत ताबडतोब कळवावा व छात्रशिक्षकाने परिषदेशी पत्रव्यवहार करताना संदर्भासाठी नेहमी आपले नाव, पूर्ण पत्ता मार्गदर्शन केंद्र व आपला नोंदणी क्रमांक न चुकता लिहावा. आवश्यकता भासल्यास छात्रशिक्षकाने परिषदेशी पुढील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

**मा. संचालक,**

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( विद्या परिषद ) पुणे.**

**( पत्रव्दारा प्रशिक्षण योजना विभाग. )**

**708, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे 411030.**

## <u>पत्रव्दारा अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रम प्रवेश ( 2016-2017 )</u>

## <u>आवेदन पत्र</u>

**( उमेदवाराने भरावयाचे आहे. )**

1) **उमेदवाराचे पूर्ण नांव** :- ( प्रथम नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव या क्रमाने लिहावे )

----------------------------------------------------------------------

2) **उमेदवाराचे पूर्ण नांव** :- (इंग्रजी अक्षरात First Name, Middle Name, Last Name)

--------------------------------------------------------------------------

3) **लिंग** :- ( स्त्री / पुरुष )

----------------

4) **जात संवर्ग** :- ( **SC / ST / VJ-A / NT-B / NT-C / NT-D / SBC / OBC / Open** )

------------------------

5) **जन्मदिनांक** :- दिनांक ( DD ) ---------- महिना ( MM ) ----------- वर्ष ( YYYY) -------------

6) **नेमणूक दिनांक** :- दिनांक ( DD ) ---------- महिना ( MM ) ----------- वर्ष ( YYYY) -------------

7) **शैक्षणिक पात्रता**

| अ. क्र. | परीक्षेचे नाव | परीक्षा माध्यम | परीक्षा उत्तीर्ण वर्ष | शेकडा गुण | परीक्षा मंडळाचे/ विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एस एस सी | | | | |
| 2 | एच एस सी | | | | |
| 3 | पदवी ( शाखा ---------------) | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |

**८) सद्या कार्यरत शाळेचे नाव व पूर्ण पत्ता पिनकोडसह**

----------------------------------------------------------------------------------------------------

**९) नेमणूक दिनांकापासून सध्या कार्यरत असलेल्या शाळेचे नाव व पत्ता ( पीनकोड नंबर सहित )**

| अ न | नेमणूक शाळेचे नाव व पूर्ण पत्ता | शाळेचे मध्यम | शाळेचे व्यवस्थापन ( शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी / आदिवासी विकास / समाजकल्याण विभाग / अपंग / कल्याण विभाग इत्यादी ) | अनुदान प्रकार (अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित ) | नेमणूक संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | धारण केलेले पद | नेमणूक दिनांक पासून | नेमणूक दिनांक पर्यंत | नेमणूक आदेशाचा पत्र क्रमांक व दिनांक | वैयक्तिक मान्यतेचा दिनांक व वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | | | | | | | | | | | |

**दिनांक :** **उमेदवाराची स्वाक्षरी**

**ठिकाण :** **पूर्ण नाव**

वरील आवेदन पत्रात भरलेली माहिती मी स्वतः तपासली असून ती बरोबर असल्याची खात्री केली आहे. सदर उमेदवारास प्रवेश देण्यास शिफारस आहे

**मुख्याध्यापकाचे नाव**
**शाळेचे नाव पूर्ण पत्ता शिक्का**

**शालेय शिक्षण विभाग /**
**समाज कल्याण विभाग /**
**अपंग कल्याण विभाग /**
**आदिवासी कल्याण विभाग /**
**विजा / भज कल्याण विभाग**
**यांचा शिक्का व स्वाक्षरी**

पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रम

**<u>पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षण प्रवेश प्रक्रिया सन 2016-2017 अंमलबजावणी वेळापत्रक</u>**

| अ. क्र | कार्यवाहीचा तपशिल | नियोजित कालावधी |
|---|---|---|
| 1 | विभागीय शिक्षण उपसंचालक / विज्ञान सल्लागार, अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग, प्रादेशिक उपआयुक्त समाज कल्याण यांची बैठक घेऊन आवेदनपत्र व माहिती पुस्तिका वितरण व मार्गदर्शन करणेबाबत. | 04/04/2016 |
| 2 | माहिती पुस्तिका <u>www.mscert.org.in</u> या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे. | 04/04/2016 |
| 3 | विभागीय शिक्षण उपसंचालक, अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग, प्रादेशिक उपआयुक्त समाज कल्याण यांनी सहविचार सभा घेऊन आवेदनपत्र व माहिती पुस्तिकाबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई, प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना सादर करणेबाबत मार्गदर्शन करणे. | 05/04/2016 |
| 4 | पूर्ण भरलेले आवेदनपत्र उमेदवारांनी शिक्षणाधिकारी (प्राथ) / सहाय्यक आयुक्त समाज कल्याण आणि प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग यांच्याकडे सादर करणे. ( सुट्टीचे दिवस वगळून सकाळी 10 ते सायं.5 वाजेपर्यत ) | 06/04/2016 ते 18/04/2016 |
| 5 | शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी तयार केलेली विहित प्रपत्रातील माहिती शिफारशीसह व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आवेदनपत्रे व शिफारस असलेली व शिफारस नसलेली स्वतंत्र यादी विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करणे. | 22/04/2016 |
| 6 | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी तयार केलेली विहित प्रपत्रातील माहिती शिफारशीसह व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आवेदनपत्रे व शिफारस असलेली व शिफारस नसलेली स्वतंत्र यादी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण (पुणे, औरंगाबाद, नाशिक, मुंबई, अमरावती, नागपूर) यांच्याकडे सादर करणे. | 22/04/2016 |
| 7 | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांनी तयार केलेली विहित प्रपत्रातील माहिती शिफारशीसह व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आवेदनपत्रे व शिफारस असलेली व शिफारस नसलेली स्वतंत्र यादी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग (नागपूर, अमरावती, नाशिक, ठाणे) यांच्याकडे सादर करणे. | 22/04/2016 |
| 8 | विभागीय शिक्षण उपसंचालक, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी पात्र असलेली व अपात्र असलेली स्वतंत्र यादी शिफारशीसह DVB-TT-Surekh, Font-14 मध्ये MS Excel मध्ये विहित प्रपत्रातील माहिती मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( विद्या परिषद) पुणे यांचेकडे CD व प्रिंट कॉपीसह सादर करणे | 28/04/2016 |

**(गोविंद नांदेडे)**

**संचालक**

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व**

**प्रशिक्षण परिषद, पुणे 30.**

**प्रसिध्दीनिवेदन**

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे *30***

**पत्रव्दारा शिक्षणशास्त्र पदाविका अभ्यासक्रम प्रशिक्षणाबाबत.**

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका, कटक मंडळाच्या प्राथमिक शाळा आणि सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या शासनमान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक अनुदानित, विनाअनुदानित, कायम विना अनुदानित शाळा तसेच आदिवासी विकास व समाजकल्याण विभागाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा व शासकीय मान्यताप्राप्त खाजगी आश्रमशाळांतील पात्र अप्रशिक्षित प्राथमिक, माध्यमिक शिक्षक, शिक्षण सेवक, निमशिक्षक अपंग एकात्मिक शिक्षण योजनेतील शिक्षक यांच्यासाठी **सन-2016-2017 साठी दिनांक 09/02/2016 च्या शासन निर्णयानुसार पत्रद्वारा पत्रद्वारा शिक्षणशास्त्र पदाविका अभ्यासक्रम प्रशिक्षण योजनेची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.** पत्रद्वारा शिक्षणशास्त्र पदाविका अभ्यासक्रम प्रशिक्षण प्रवेशाचे आवेदनपत्र व माहितीपुस्तिका महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( विद्या परिषद ) पुणे. यांच्या www.mscert.org.in या संकेतस्थळावर माहिती पत्रक आणि आवेदनपत्राचा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. संबंधित अप्रशिक्षित शिक्षक / शिक्षण सेवकांनी पूर्ण भरलेली आवेदनपत्रे दिनांक **06/04/2016 ते 18/04/2016** पर्यंत या कालावधीत आपल्या विद्यालयाच्या मुख्याध्यापकांमार्फत माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे सादर करावीत. उशिरा अगर पोस्टाने व कुरिअरने आलेली आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत. या पात्र अप्रशिक्षित शिक्षकांनी दिनांक 28/02/2019 पूर्वी प्रशिक्षित होणे बंधनकारक आहे याची सेवेत असलेल्या आणि सक्षम प्राधिका-याची मान्यता असलेल्या सर्व व्यवस्थापनाच्या व माध्यमाच्या पात्र अप्रशिक्षित प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांनी नोंद घ्यावी.

**(गोविंद नांदेडे)**<br>
**संचालक**<br>
**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व**<br>
**प्रशिक्षण परिषद, पुणे 30.**

## प्राप्त आवेदनपत्रांची जिल्हा स्तरावरील छानननी कार्यवाही

जिल्हा स्तरावर प्राप्त झालेल्या सर्व आवेदनपत्रांची छाननी शालेय शिक्षण व क्रीडा विभागासाठी शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) हे आणि समाज कल्याण विभाग / अपंग कल्याण विभाग / आदिवासी कल्याण विभाग / विजा, भज कल्याण विभाग यांचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी हे करतील. छाननी झाल्यानंतर वरील जिल्हा स्तरावरील छाननी प्रमुख शिफारस असलेले आणि शिफारस नसलेले आवेदनपत्र खालील नमुन्यात यादी करतील व स्वाक्षरी केलेली प्रत त्यांच्या विभाग स्तरावरील अधिकारी यांना दोन प्रतीत मूळ आवेदन पत्रासह पाठवतील. तसेच त्याची एक सा ॅपट कॉपी सोबत सादर करतील.

(अ) शालेय शिक्षण विभागाच्या अनुदानित / विना अनुदानित / कायम विनाअनुदानित सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळातील प्राप्त आवेदनपत्रांची छाननी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करुन प्रवेशास पात्र, अपात्र उमेदवारांची **जिल्हानिहाय** यादी **प्रपत्र अ** मध्ये तयार करावी.

(ब) समाजकल्याण विभागाच्या शासकीय / खाजगी आश्रम शाळातील प्राप्त आवेदनपत्राची छाननी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी करुन प्रवेशास पात्र, अपात्र उमेदवाराची **जिल्हानिहाय** यादी **प्रपत्र अ मध्ये** तयार करावी.

(क) आदिवासी विकास विभागाच्या शासकीय / खाजगी आश्रम शाळातील प्राप्त आवेदनपत्राची छाननी प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांनी करुन प्रवेशास पात्र, अपात्र उमेदवाराची **जिल्हानिहाय** यादी **प्रपत्र अ मध्ये** तयार करावी.

### पत्रव्दारा प्रशिक्षण योजना 2016-17

**जिल्हा:-** **प्रपत्र अ** **दिनांक:-**

शिक्षणाधिकारी (प्राथ.) / सहाय्यक आयुक्त समाज कल्याण / प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास विभाग यांचे कार्यालय

| अ क्र | आवेदन पत्र क्रमांक | उमेदवाराचे नाव | कार्यरत शाळेचे नाव व पूर्ण पत्ता | व्यवस्थापन प्रकार | अनुदान प्रकार | शाळेचे माध्यम | नेमणूक दिनांक | सेवा सलग आहे / नाही | शैक्षणिक अर्हता | वैयक्तिक मान्यता आदेश क्रमांक व दिनांक | प्रवेशासाठी शिफारस आहे / नाही. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | | | | |

**स्वाक्षरी/-**

**जिल्हास्तर छाननी अधिकारी**

**शालेय शिक्षण विभाग / समाज कल्याण विभाग / अपंग कल्याण विभाग / आदिवासी कल्याण विभाग / विजा, भज कल्याण विभाग यांचा शिक्का व स्वाक्षरी**

## प्राप्त आवेदनपत्रांची विभाग स्तरावरील अंतिम छाननी व पात्र / अपात्र बाबत कार्यवाही

विभाग स्तरावर प्राप्त झालेल्या सर्व आवेदनपत्रांची अंतिम छाननी व पात्र / अपात्र बाबत कार्यवाही शालेय शिक्षण व क्रीडा विभागासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक हे आणि समाज कल्याण विभाग / अपंग कल्याण विभाग / आदिवासी कल्याण विभाग / विजा, भज कल्याण विभाग यांचे विभाग स्तरावरील प्रमुख अधिकारी हे करतील. अंतिम छाननी व पात्र / अपात्र बाबत कार्यवाही झाल्यानंतर वरील विभाग स्तरावरील छाननी प्रमुख शिफारस असलेले आणि शिफारस नसलेले आवेदनपत्र खालील नमुन्यात यादी करतील व स्वाक्षरी केलेली प्रत मा. संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( विद्या परिषद ) पुणे ३०. यांना दोन प्रतीत पाठवतील. तसेच त्याची एक साॅफ्ट कॉपी सोबत सादर करतील. **आवेदनपत्र व त्यासोबत असलेल्या साक्षांकित प्रती विभागस्तरावर जतन करुन ठेवाव्यात. या कार्यालयाकडे पाठवू नयेत.**

(अ) शालेय शिक्षण विभागाच्या अनुदानित / विना अनुदानित / कायम विनाअनुदानित सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळातील प्राप्त आवेदनपत्रांची छाननी विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी करुन प्रवेशास पात्र, अपात्र उमेदवारांची **विभाग निहाय** यादी **प्रपत्र ब** मध्ये तयार करावी.

(ब) समाजकल्याण विभागाच्या शासकीय / खाजगी आश्रम शाळातील प्राप्त आवेदनपत्राची छाननी त्यांचे विभाग स्तरावरील अधिकारी समाज कल्याण यांनी करुन प्रवेशास पात्र, अपात्र उमेदवाराची **विभाग निहाय** यादी **प्रपत्र ब मध्ये** तयार करावी.

(क) आदिवासी विकास विभागाच्या शासकीय / खाजगी आश्रम शाळातील प्राप्त आवेदनपत्राची छाननी त्यांचे विभाग स्तरावरील अधिकारी प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांनी करुन प्रवेशास पात्र, अपात्र उमेदवाराची **विभाग निहाय** यादी **प्रपत्र ब मध्ये** तयार करावी.

### पत्रव्दारा प्रशिक्षण योजना 2016-17

**विभाग :-** **प्रपत्र ब** **दिनांक:-**

शिक्षणाधिकारी (प्राथ.) / सहाय्यक आयुक्त समाज कल्याण / प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास विभाग यांचे कार्यालय

| अ क्र | आवेदन पत्र क्रमांक | उमेदवाराचे नाव | कार्यरत शाळेचे नाव व पूर्ण पत्ता | व्यवस्थापन प्रकार | अनुदान प्रकार | शाळेचे माध्यम | नेमणूक दिनांक | सेवा सलग आहे / नाही | शैक्षणिक अर्हता | वैयक्तिक मान्यता आदेश क्रमांक व दिनांक | प्रवेशासाठी पात्र आहे / नाही. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |

**स्वाक्षरी/-**

**विभाग स्तर छाननी अधिकारी**

**शालेय शिक्षण विभाग / समाज कल्याण विभाग / अपंग कल्याण विभाग / आदिवासी कल्याण विभाग / विजा, भज कल्याण विभाग यांचा शिक्का व स्वाक्षरी**

## <u>विभागीय स्तरावरील कार्यवाही</u>

(अ) प्रवेशास अपात्र ठरलेल्या उमेदवारांना विभाग स्तरावरील अधिका-यांनी अपात्रतेच्या कारणासहित त्यांच्या स्तरावरुन लेखी कळविण्यात यावे. व त्याबाबतचा अहवाल परिषदेस सादर करावा.

(ब) **पत्रव्दारा प्रशिक्षण योजना 2016-2017 अंतर्गत प्राप्त आवेदन पत्राचे जतन विभागीय कार्यालयाने करावे, कारण न्यायालयीन प्रकरण, माहिती अधिकार यासारख्या अत्यंत महत्वाच्या प्रकरणाकरिता जपणूक आवश्यक आहे.**

(क) राज्यातील कार्यरत पात्र अप्रशिक्षित शिक्षकापैकी कोणीही पत्रव्दारा प्रशिक्षणाच्या उपलब्ध करुन दिलेल्या संधीपासून वंचित राहाणार नाही याबाबत क्षेत्रीय अधिका-यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

**(गोविंद नांदेडे)**
**संचालक**
**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व**
**प्रशिक्षण परिषद, पुणे 30.**